सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४६१४२०)

जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०२२/ 1624 दि.०७.०७.२०२२

प्रति,

**प्राचार्य / संस्था प्रमुख,**

सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषयः उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

**संदर्भः** १. मा.संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२२/७७, दि.०८.०६.२०२२

२. या कार्यालयाचे पत्र क्र.विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०२२/१३८०, दि.०९.०६.२०२२

३. मा.संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/ २०२२/८८, दि.०७.०७.२०२२

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, शासन निर्णय दि.०४ ऑक्टोबर २०१८ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहिर करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीताची जाहिरात दि.०९ जून, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याबाबत आपणांस संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले होते की, सदर शिष्यवृत्तीसाठी Online पध्दतीने अर्ज करावयाचे असून, उमेदवारांनी अर्ज करण्याची मुदत दि.०८ जुलै, २०२२ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. तसेच Online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत दि.११ जुलै, २०२२ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती.

तरी सदरची मुदत वाढवून आता उमेदवारांनी Online पध्दतीने अर्ज करण्याची मुदत **दि.०८ जुलै, २०२२ वरुन दि.२२ जुलै, २०२२ अशी** करण्यात आली आहे. तसेच Online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत **दि.११ जुलै, २०२२ वरुन दि.२५ जुलै, २०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** करण्यात आलेली आहे.

(डॉ. संजय जगताप)
**विभागीय सहसंचालक,**
**उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल**

प्रत:

१. मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.
२. मा.संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सादर.